# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.03.2026** **वारः गुरुवार**

---

1. सरकार स्वयंपाकाच्या गॅसची आयात सुरळीत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनची माहिती
2. सर्वोच्च न्यायालयाची प्रथमच सकारात्मक इच्छामरणाला परवानगी
3. पश्चिम आशियातील भारतीय नागरिकांना मायदेशात सुखरुप परत आणण्यासाठी भारताचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आणि
4. एफआयएच महिला हॉकी विश्वचषक पात्रता स्पर्धेत भारतीय संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश

**<u>बीपीसीएल</u>**

सरकार स्वयंपाकाच्या गॅसची आयात सुरळीत आणि मुक्तपणे पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे असं भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशननं म्हटलं आहे. सध्याच्या भू-राजकीय परिस्थिती आणि एलपीजी आयातीवर परिणाम करणाऱ्या नाकाबंदीमुळे, व्यापकवितरण सुनिश्चित करण्यासाठी उपलब्ध पुरवठ्याचं काळजीपूर्वक रेशनिंग केलं जात आहे.एलपीजी सिलिंडरच्या वाटपात घरगुती पुरवठ्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलं आहे. एलपीजी पुरवठ्यासाठी आलेल्या इतर विनंतींवर सध्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेश, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशनच्या कार्यकारी संचालकांचा समावेश असलेल्या संयुक्त समितीद्वारे आढावा घेतला जात असल्याचंही कंपनीनं म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-केरळम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केरळम आणि तमिळनाडूमध्ये 16 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचा आरंभ केला. केरळममधील एर्नाकुलम इथं पंतप्रधानांच्या हस्ते 11 हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन झालं. कोची इथं अखिला केरळ धीवरा सभेच्या सुवर्ण महोत्सवी समारंभालाही पंतप्रधानांनी संबोधित केलं. तसंच कोची इथं एनडीएच्या बैठकीलाही हजेरी लावली. सध्याच्या जागतिक ऊर्जा संकटानं पुन्हा एकदा आत्मनिर्भर होण्याचं महत्त्व सिद्ध केलं आहे. ऊर्जा क्षेत्रात इतर देशांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारनं अलिकडच्या काळात अनेक पावले उचलली आहेत, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

पंतप्रधानांच्या हस्ते तिरुचिरापल्ली इथल्या पंजपूरमध्ये 5,650 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि पूर्ण झालेल्या प्रकल्पांचं लोकार्पण झालं. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले, केंद्र सरकारनं सुरू केलेल्या पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांमुळे स्थानिक अर्थव्यवस्था सुधारेल आणि स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील.

यावेळी त्यांनी पाच नवीन रेल्वे सेवांना हिरवा झेंडा दाखवला. भारत पेट्रोलियमच्या नीलगिरी आणि इरोड जिल्ह्यांमधील शहरी गॅस वितरण सुविधेचीही पायाभरणी केली. तसंच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन ल्युब ब्लेंडिंग प्रकल्पाचंही लोकार्पण केलं.

**संसद कामकाज**

राज्यसभेत आज ग्रामीण विकास मंत्रालयाच्या कामकाजावर पुढील चर्चा होणार आहे, तर लोकसभेत, अर्थमंत्री निर्मला सीतारामन विनियोजन विधेयक, 2026 सादर करणार आहेत. तसंच रेल्वे मंत्रालयाच्या मागण्यांवरही चर्चा होणार आहे.

दरम्यान, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना पदावरुन दूर करण्याच्या विरोधी पक्षांच्या ठरावाला लोकसभेनं काल आवाजी मतदानानं नकार दिला. सभागृहातील चर्चेला उत्तर देताना, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि गृहमंत्री अमित शहा म्हणाले, विरोधकांनी सभापतींच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं, हे दुर्दैवी आहे. जवळजवळ चार दशकांनंतर लोकसभेच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्यात आला आहे, ही संसदीय राजकारण आणि सभागृहासाठी खेदजनक घटना आहे. सभापती कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा सभागृहाचे आहेत असं सांगून शहा म्हणाले की, भाजप आणि एनडीएनं कधीही लोकसभेच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणला नाही कारण सभापतींची प्रामाणिकता संशयाच्या पलीकडे आहे असा पक्षाचा विश्वास आहे.

**सर्वोच्चन्यायालय- इच्छामरण**

सर्वोच्च न्यायालयानं काल प्रथमच सकारात्मक इच्छामरणाला परवानगी देण्याचा निर्णय घेतला. गेल्या बारा वर्षांपासून कोमात असलेल्या 32 वर्षीय तरुणाची जीवरक्षक प्रणाली काढून घेण्याला न्यायालयानं परवानगी दिली. गाझियाबादमधील हा तरुण 2013 मध्ये चौथ्या मजल्यावरुन खाली पडल्यामुळं त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली होती. तेव्हापासून तो बेशुद्धावस्थेत होता. वैद्यकीय पथकानं तो बरा होण्याची काहीच शक्यता नसल्याचा अहवाल दिला होता.

**राष्ट्रपती जलशक्ती**

जल संवर्धन हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. जल महोत्सवाअंतर्गत नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. पाण्याचं मोल जाणून हा खजिना भविष्यातल्या पिढ्यांसाठी सांभाळून ठेवला पाहिजे असं त्यांनी सांगितलं. देशभरात आठ मार्चपासून सुरू झालेला हा जल महोत्सव 22 मार्चपर्यंत चालणार आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत कृषी-खाद्यान्न व्यवस्थेत महिलांचा सहभाग या विषयावरील जागतिक परिषदेचं उद्घाटन होणार आहे. प्रगतीचा मार्ग दाखवा, नवी उंची गाठा या संकल्पनेवर आधारित ही तीन दिवसीय परिषद भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणार असून, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

**आयईए**

एकीकडे तेलाचा पुरवठा खंडित होत असताना, आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेनं आपत्कालीन तेल साठा सोडण्यासाठी घेतलेल्या निर्णयाचं भारतानं स्वागत केलं आहे. पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयानं एका निवेदनात सांगितलं की भारत आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेचा सहयोगी सदस्य आहे आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा सहकार्यात सक्रिय सहभागी आहे. भारत जागतिक ऊर्जा बाजारपेठेतील, विशेषतः पश्चिम आशियातील परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून आहे आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या प्रयत्नांनुसार जागतिक बाजारपेठेतील स्थिरतेला पाठिंबा देण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यास तयार आहे.

**पश्चिम आशिया-भारतीय**

पश्चिम आशियातील भारतीय नागरिकांना मायदेशात सुखरुप परत आणण्यासाठी भारताचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. लेबनॉन आणि कतारमधून व्यावसायिक विमानांनी शेकडो भारतीयांना परत आणलं आहे. बेरूतमधील भारतीय दूतावासाच्या म्हणण्यानुसार, 177 भारतीय नागरिकांच्या पहिल्या तुकडीला काल नवी दिल्लीला परत आणण्यात आलं, तर  कतारमध्ये अडकलेले 500 हून अधिक भारतीय काल रात्री कतार एअरवेजच्या विमानांनी नवी दिल्ली आणि इतर ठिकाणी सुखरुप पोहोचल्याचं कतारमधील भारतीय दूतावासानं म्हटलं आहे.  कतार एअरवेज आज नवी दिल्ली आणि मुंबई अशा दोन ठिकाणांसाठी विमानसेवा देणार आहे. नागरिकांच्या मदतीसाठी भारतीय दूतावासाच्या 24 तास सुरू असलेल्या तीन हेल्पलाइन उपलब्ध असून, दूतावास आठवड्यातील सर्व दिवस खुलं आहे. एक ते दोन दिवसांत तत्काळ पासपोर्ट जारी केले जात आहेत. दरम्यान, नागरिकांनी अधिकृत माध्यमांद्वारे जारी केलेल्या सूचना आणि आवश्यक मार्गदर्शक तत्त्वांचं पालन करावं असं आवाहनही दूतावासानं केलं आहे.

**पंतप्रधान- किसान निधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आसाममधील गुवाहाटी इथून पंतप्रधान किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा 22 वा हप्ता जारी करतील. या हप्त्याअंतर्गत, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे देशभरातील 9 कोटी 32 लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यांमध्ये 18 हजार 640 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम थेट हस्तांतरित केली जाईल, असं कृषी  मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. यावेळी 2.15 कोटींहून अधिक महिला शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळेल  असंही चौहान यांनी सांगितलं.

**बीसीसीआय-आयपीएल 2026**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयनं इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याचं वेळापत्रक काल जाहीर केलं. 28 मार्च ते 12 एप्रिल 2026 दरम्यान ही स्पर्धा होणार आहे. पहिला सामना 28 मार्च रोजी बेंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी मैदानावर गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) यांच्यात होणार आहे. त्यानंतर  29 तारखेला मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होईल. बेंगळुरू, मुंबई, गुवाहाटी, न्यू चंदीगड, लखनौ, कोलकाता, चेन्नई, दिल्ली, अहमदाबाद आणि हैदराबाद या 10 ठिकाणी एकूण 20 सामने खेळवले जातील, असं बीसीसीआयनं म्हटलं आहे.

**<u>स्विस ओपन बॅडमिंटन</u>**

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किरण जॉर्जनं काल माजी विश्वविजेता सिंगापूरचा लोह कीन यू याचा 23-21, 21-19 असा पराभव केला, तर हाँगकाँगच्या जेसन गुणवाननं भारताच्या किदाम्बी श्रीकांतचा पराभव केला. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या भारतीय जोडीनं त्यांच्या पहिल्या सामन्यात जेस्पर टॉफ्ट आणि डेन्मार्कच्या अमली मॅगेलुंडवर विजय मिळवला. या जोडीचा सामना आता चीनच्या जोडीशी होणार आहे. महिला एकेरीत, थायलंडच्या चोचुवोंगनं मालविका बनसोडचा पराभव केला, तर तन्वी शर्मा आणि उन्नती हुडा यांनाही 32 व्या फेरीच्या सामन्यात पराभव पत्करावा लागला.

**<u>एफआयएच हॉकी</u>**

एफआयएच महिला हॉकी विश्वचषक पात्रता स्पर्धेत भारतीय संघानं काल  हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात वेल्सविरुद्ध  4-1 असा दमदार विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. आता उपांत्य फेरीत भारताचा सामना इटलीशी होईल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार